# जनसंपर्क विभाग

जळगाव ८ (प्रतिनिधी) : नवीन शैक्षणिक धोरणाची पदवी स्तरावर अंमलबजावणी येत्या शैक्षणिक सत्रात केली जाणार असून त्याअनुषंगाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात गुरुवार दि. ९ मे रोजी संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

दि. ९ मे रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात दिवसभर ही कार्यशाळा होणार असून वाणिज्य व व्यवस्थापन, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, मानव्य व आंतरविद्या शाखा यांची अभ्यासक्रम रचना यावर विविध सत्रांमध्ये चर्चा होणार आहे. यामध्ये अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे, प्राचार्य एस.एस. राजपूत, प्रा. जगदीश पाटील हे सहभागी होणार आहेत. स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य एस.एन. भारंबे, प्राचार्य प्रिती अग्रवाल आणि प्राचार्य ए.बी. जैन हे त्यांचे अनभव सांगणार आहेत. प्रारंभी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे भूमिका मांडतील. मूल्यांकन आणि मूल्यमापन यावरही चर्चा होईल. दुपारी ३.३० वाजता कुलगुरु प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या उपस्थितीत समारोप होणार आहे. नवीन शैक्षणिक वर्षात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात पदवीस्तरावर नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी केली जाणार आहे.

**बातमी क्र. २**

जळगाव ८ (प्रतिनिधी) : लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतदान करता यावे म्हणून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने महाराष्ट्र शासनाच्या आधिसूचनेनुसार मतदानाच्या दिवशी सुट्टी जाहीर केली आहे.

जळगाव, रावेर आणि नंदुरबार लोकसभा मतदार संघात दि. १३ मे रोजी तर धुळे लोकसभा मतदार संघात ३०मे रोजी मतदान होणार आहे. मतदानाकरीता शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी अधिकारी यांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी दि. १३ मे रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. त्या त्या मतदार संघाच्या क्षेत्रातील मतदानाकरीता संबंधित कर्मचाऱ्यांना ही सुट्टी लागू राहिल. अशी माहिती कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी परिपत्रकाद्वारे दिली आहे.

**बातमी क्र. ३**

जळगाव ८ (प्रतिनिधी) : राष्ट्रीय सेवा योजनेच्या आपत्ती व्यवस्थापन शिबिरात घेतलेल्या प्रशिक्षणाचा उपयोग साक्री येथील रा.से.यो. स्वयंसेवकाने प्रसंगावधान राखत केल्यामुळे एस.टी. बसच्या इंजिनला लागलेली आग विझविण्यात यश मिळाले.

साक्रीच्या विमलबाई उत्तमराव पाटील महाविद्यालयातील रा.से.यो. एककाचा स्वयंसेवक सागर पवार याने हे प्रसंगावधान राखले. नंदुरबार ते नाशिक ही बस प्रवाशी घेवून साक्री तालुक्याती छडवेल कोर्डे येथून जात होती. त्याचवेळी बसच्या इंजिनमध्ये आग लागली. प्रवासी घाईगडबडीत उतरत असलेले सागर पवारने पाहिले. इंजिनमध्ये लागलेली आग पाहून त्याने तातडीने एका दुचाकीस्वाराकडे लिफ्ट मागितली आणि जवळच्या

## जनसंपर्क विभाग

पेट्रोलपंपावर जाऊन अग्नीशामक यंत्र आणून बसमधील आग विझवली. त्यामुळे प्रवाशांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. सागर हा गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे झालेल्या राज्यपातळवरील आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून सहभागी झाला होता. या शिबीरात आग विझविण्याचे धडे त्याने घेतले होते ते प्रत्यक्ष कामात आले.

.................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ८ मे, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी